# धर्मराज्य पक्ष

अध्यक्ष
**राजन राजे**

संदर्भ क्र.________ दिनांक : ०२/०४/२०१६

<u>प्रसिध्दीकरिता</u>

## फुटलेली जलवाहिनी दुरूस्त करण्यास ठामपाची चालढकल
## ‘धर्मराज्य पक्षा’चा तीव्र आंदोलनाचा इशारा

**<u>ठाणे (प्रतिनिधी), दि. ०२</u>** : लोकमान्यनगर पाडा क्र. ४ मधील डॉ. खताळ यांच्या दवाखान्यासमोर असलेल्या ड्रेनेज चेंबरमध्ये सुमारे ६ ते ८ इंच व्यासाची जलवाहिनी फुटलेली असून, ड्रेनेजमधील अशुध्द पाणी जलवाहिनीमार्फत नागरिकांना प्यावे लागत असल्याचा धक्कादायक प्रकार गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे. याबाबत **‘धर्मराज्य पक्षा’**चे **लोकमान्यनगर येथील प्रभाग अध्यक्ष महेश क्षिरसागर** यांनी सततचा पाठपुरावा व पत्रव्यवहार करूनदेखील ठाणे महानगरपालिकेचे आरोग्य विभाग याकडे दुर्लक्ष करीत असून, अधिकारी याप्रकरणाची जबाबदारी एकमेकांवर ढकलून अक्षरशः स्थानिक नागरिकांच्या जीवाशी खेळत आहेत. त्यामुळे, येत्या चार दिवसांत ड्रेनेज चेंबरमधील फुटलेली जलवाहिनी दुरूस्त करून, ती ड्रेनेजबाहेर काढून सुरक्षित स्थळी न हलविल्यास **‘धर्मराज्य पक्ष’** स्थानिक नागरिकांना सोबत घेऊन, ठामपा प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन उभारेल, असा इशारा महेश क्षिरसागर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिला आहे.

दरम्यान, वर्तकनगर प्रभाग समितीच्या हद्दीतील लोकमान्यनगर पाडा क्र. ४ मधील नागरिकांना गेल्या काही दिवसांपासून दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याने, त्यांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत महेश क्षिरसागर यांनी महापालिकेच्या आरोग्य आणि पाणीपुरवठा विभागाकडे सातत्याने पत्रव्यवहार करूनदेखील संबंधित विभागाचे अधिकारी याप्रकरणी गंभीर नसल्याचे निदर्शनास आले असल्याचे क्षिरसागर यांनी म्हटले आहे. याप्रकरणी, **आरोग्य विभागाचे अधिकारी राम केंद्रे यांना विचारले असता, “आपण स्वत: याबाबत पाणी पुरवठा विभागाला चार पत्र पाठविली आहेत; तसेच, दूषित पाण्याचा नमूना व अहवालदेखील सोपवलेला आहे. तुम्ही पुढील कार्यवाहीसाठी आयुक्तांना भेटा.”** असे बेजबाबदारपणाचे उत्तर त्यांनी दिले. शिवाय, एका छोट्याशा ड्रेनेज चेंबरसाठी तब्बल ३८ लाखांची निविदा का काढण्यात आली ? असा सवालदेखील महेश क्षिरसागर यांनी यावेळी उपस्थित केला आहे. तरी, येत्या चार ते पाच दिवसांत ड्रेनेज चेंबरमधील फुटलेली जलवाहिनी दुरूस्त करून, ती सुरक्षित स्थळी न हलविल्यास, **‘धर्मराज्य पक्षा’**ला आक्रमकपणे रस्त्यावरची लढाई लढावी लागेल, असा इशारा महेश क्षिरसागर यांनी शेवटी दिला आहे.

------@@@------

ए/एर०३, 'पांचजन्य'-२, रिगलप्लाझा-लोकपुरम प्रिमायसेस् को.ऑ.हौ. सोसायटी, ग्लॅडीज् अल्वारिस मार्ग, पोखरण रोड नं.२, ठाणे (प.)-४०० ६१०, दूरध्वनी : २१७१ ६७२१ / ८१०८१ २५०००

७/६०१-६०२, 'पांचजन्य', शुभारंभ, फेज-१, कोकणी पाडा मार्ग, द्वारा-घोडबंदर रोड, मानपाडा, ठाणे (प.)-४०० ६१०. दूरध्वनी : ६५२७ ०००१ / २७७९ ०६७००

*“सर्व सामान्यांचं जीवन-मरण आणि पर्यावरण, हवं एवढयासाठीच राजकारण!”...*